# तिळ

## प्रस्तावना

भारताचा क्षेत्रफळ आणि उत्पादन या दोन्ही बाबतीत तीळ पिकविण्यामध्ये जगात प्रथम क्रमांक लागतो. तिळाच्या पिकाखाली सुमारे ३.७९७ लाख हेक्टर क्षेत्र असुन त्यापासुन ०.७७५ लाख मेट्रीक टन उत्पादन मिळुन उत्पादन २०५ किलो प्रति हेक्टर येते. हे पिक अर्धरबी (रबी हंगामात लवकर पेरणी) म्हणुन चंद्रपुर, गडचिरोली, नागपुर, वर्धा व नांदेड जिल्हयाच्या काही भागात घेतात. बाकी (जळगाव, धुळे, लातुर, बुलढाणा, इत्यादी भागात) खरीप तीळ घेतात. विदर्भाच्या काही भागात हे पीक उन्हाळयात सुद्धा घेतले जाते. खाद्यतेला व्यतिरिक्त, मसाला, तिळगुळ, रेवडी इत्यादीसाठी तिळाचा उपयोग होतो आणि पेंड गुरांना खाऊ घालतात.

## जमीन:-

हलकी, वाळूमिश्रीत, चिकण मातीची जमीन या पिकासाठी उत्तम होय. चांगला निचरा होणाऱ्या सर्व प्रकारच्या जमिनीत तिळाचे पीक येऊ शकते. रेताड व विम्लयुक्त (खारवट) जमीनीत हे पीक घेऊ नये.

पुर्वमशागत:-तीळ हे व्दिदल पीक असुन त्याचे सोटमुळ ६० ते ९० सें.मी. खोल जाते. मुळाला जमिनीच्या पृष्ठभागाजवळ शाखा, उपशाखा फुटतात. एक नांगरणी व उभी आडवी कुळवणी किंवा वखरणी करावी. ढेकळे फोडुन जमीन भुसभुशीत करावी. नंतर फळी फिरवुन जमिनीचा पृष्ठभाग थोडा घट्ट करावा.



## सुधारीत जाती:-

तीळाच्या खरीप हंगामातील जाती रबी हंगामात व रबी हंगामातील जाती खरीप हंगामात चांगल्या येत नाहीत. तसेच एखादया कृषि हवामान विभागात जास्त उत्पादन देणारी जात, दुसऱ्या विभागात जास्त उत्पादन देईल असे नाही. म्हणुन खालील शिफारस केलेल्या जातींची निरनिराळया विभागाकरीता निवड करावी.

### १. नं. ८ (चांदा८):-

ही १३० दिवसात पक्व होते आणि हेक्टरी ३.५० ते ३.७५ क्विंटल उत्पादन देते. या जातीचे बी तपकीरी रंगाचे असते. या जातीची चंद्रपुर, वर्धा, भंडारा व नागपुर जिल्हयातील अर्धरबी हंगामी पिकांचे क्षेत्रासाठी निवड करावी.

### २. फुले तीळ १:-

ही जात पक्व होण्यास ९० ते ९५ दिवस घेते आणि सरासरी हेक्टरी ५.५ ते ६.० क्विंटल उत्पादन देते. दाणा पांढराशुभ्र असुन पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडयाच्या क्षेत्रात या वाणाची निवड करावी.

### ३. तापी (जे.एल.टी. ७):-

या जातीस पक्व होण्यास ८० ते ८५ दिवस लागतात. दाण्याचा रंग पांढरा असुन ती सरासरी हेक्टरी ७ ते ८ क्विंटल उत्पादन देते. खानदेश, पश्चिम विदर्भ, जालना, औरंगाबाद या भागात चांगले उत्पादन देते. म्हणुन या भागासाठी शिफारस केलेली आहे.



### ४. टी.सी. २५ :-

ही जात पक्व होण्यास ७५ दिवस घेते आणि ६ ते ७ क्विंटल हेक्टरी उत्पादन देते. विदर्भात खरीपासाठी योग्य.

## पेरणी:-

खरीप तिळाची पेरणी जूनच्या दुसऱ्या पंधरवाडयापासुन ते जुलैच्या पहिल्या पंधरवाडयापर्यंत जमिनीत पुरेसा ओलावा झाल्यानंतर लगेच करावी. मान्सूनचा पहिला पुरेसा पाऊस आल्यावर लगेच पेरणी करावी. पुर्व विदर्भात अर्धरबी हंगामात तीळ पेरणी सप्टेंबरच्या पहिल्या आठवडयात करावी. सलग पिकासाठी दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. असलेली दुचाडी पाभर वापरावी. हेक्टरी २.५ किलो बी बारीक शेणखत अथवा मिसळुन पेरावे

त्यामुळे बी सारख्या प्रमाणात पडते. पेरणी करताना बियाणे ३ सें. मी. खोलीवर पडेल याची काळजी घ्यावी. बियाणे जास्त खोलीवर पडल्यास उगवणीवर अनिष्ट परिणाम होतो. एक किलो बियाणास २ ते ३ ग्रॅम थायरम चोळावे. मिश्रपीक घेताना मुख्य पिकामध्ये तीळ मिसळुन पेरावे, त्यामुळे तिळाची रोपे तुरळक उगवुन चांगली पोसली जातात. उन्हाळी तिळाची पेरणी फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवाडयात करावी.

पिकाचे दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. ठेवुन दोन रोपातील अंतर १५ सें. मी. ठेवल्यास हेक्टरी झाडांची संख्या २.२२ लाख राहुन चांगले उत्पादन मिळते.

## खते:-

तिळाचे मिश्रपीक घेतल्यास त्यास वेगळे खत दिले जात नाही. सलग पीक घेतल्यास मात्र या पिकाला खत देणे आवश्यक आहे. त्यासाठी सलग पिकास दर हेक्टरी ५० किलो नत्र व २५ किलो स्फुरद याप्रमाणे खताच्या मात्रा द्याव्यात. ८० दिवसानंतर तयार होणाऱ्या जातीस नत्राची मात्रा दोन हस्स्यात द्यावी. पहिला हस्सा २५ किलो नत्र पेरणीनंतर ३ आठवडयांनी (विरळणीनंतर) व दुसरा हस्सा पहिल्या हस्स्यानंतर ३ आठवडयांनी द्यावा. लवकर येणाऱ्या (७० - ७५ दिवस) जातीसाठी (हावरी) नत्राची अर्धीमात्रा पेरणीचे वेळेस व अर्धीमात्रा ३ आठवडयांनी (विरळणीनंतर) द्यावी.

## विरळणी:-

तिळाच्या उत्पादनासाठी झाडांची हेक्टरी संख्या २.०० लाख असणे जरुरीचे आहे. त्यासाठी बियाणे उगवणीनंतर २१ दिवसांनी दोन रोपात १० ते १५ सेंमी. अंतर ठेवुन विरळणी करावी. यावेळेस मध्यम ते उशीरा येणाऱ्या जातीस खताचा पहिला हसा द्यावा व लवकर येणाऱ्या जातीस दुसरा हसा द्यावा.

## आंतरमशागत:-

आवश्यकतेनुसार दोन कोळपण्या व दोन ते तीन खुरपण्या १० ते १५ दिवसाच्या अंतराने देवुन शेत स्वच्छ ठेवावे.

## आंतरपिके:-

जळगाव येथे १९८७ ते १९८९ या तीन वर्षात घेतलेल्या प्रयोगात तिळामध्ये प्रामुख्याने ज्वारी (१:१) व तुर (३:१) या प्रमाणे मिश्र पीक घेतल्यास सलग तिळाच्या पिकापेक्षा अधिक फायदयाचे ठरते.

## किड व रोग :-

तिळाचे पिकाला गादमाशी, पाने खानारी अळी, पाने गुंडाळणारी अळी या किडेंचा तसेच फायलोंडी, फायटोप्थोरा, कडा-करपा, खोड कुजव्या, मुळ कुजव्या, पानावरील ठिपके व मर या रोगांचा उपद्रव होतो. किडीमुळे उत्पादनात २५ ते ३५ टक्के घट येते, तर रोगामुळे उत्पादनात १५ ते २० टक्के घट येते.

### पाने खाणारी अळी आणि पाने गुंडांळणारी अळी:-

या किडीच्या नियंत्रणासाठी बी.एच. सी. १० टक्के भुकटी २० किलो प्रति हेक्टरी धुरळावी किंवा एन्डोल्फान (थायडॉन) ३५ ई. सी. १००० मि. ली. ५०० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी.

### गादमाशी:-

ही माशी तीळ पीक फुलावर आले असता कळीत, फुलात व बोंडात अंडी घालते. याच माशीची अळी फुले व बोंडाचे आतील भाग खाऊन तेथे गाद तयार करते. अळी बोंडात जाऊन राहत असल्यामुळे तिचा नाश करण्याची समाधानकारक उपाययोजना नाही. परंतु पीक फुलावर आले असता पाण्यात मिसळणारी कार्बारील ५० टक्के भुकटी २ किलो ५०० लिटर पाण्यात किंवा ३५ टक्के प्रवाही एन्डोसल्फान दर हेक्टरी १ लिटर ५०० लिटर पाण्यात मिसळुन फवारली असता या माशीचे नियंत्रण होते.

रोग

### फायटोप्थोरा :-

हा रोग बुरशी पासुन होतो. रोग होऊ नये म्हणुन योग्य वेळी पाणी द्यावे. तसेच जमिनीत पाणी साठुन राहणार नाही याची काळजी घ्यावी.

कडाकरपा:- या रोगात प्रथम पानांवर लहान, मोठे, पांढरे पारदर्शक ठिपके दिसतात. रोगट पाने सुकुन नंतर मरुन जातात. हा रेग खोडावर देखील दिसतो. खोडाचा भाग कुजुन झाड मरते. ऍग्रोमायशीनचे १०० पी.पी. एम. द्रावणात १० मिनिटे बुडवुन बीजप्रक्रिया करावी. रोगट पालापाचोळा व झाडे नष्ट करुन टाकावीत. खोडकुजव्या, मुळकुजव्या व मर हे रोग जमिनीतुन उद्भवतात. खोड कुजव्या रोगामुळे झाडाच्या खोडावर प्रथम जमिनीलगत काळे ठिपके दिसुन ते हळुहळु शेंडयाच्या दिशेने वाढतात. मुळकुजव्या रोगामुळे खोड जमिनीच्या पातळीलगत कुजुन मोडते. मर रोगात झाड पिवळे पडुन सुकतात. या रोगावर उपाय म्हणुन रोगप्रतिबंधक जातींचा व निरोगी बियाण्यांचा वापर करावा.




### पानावरील ठिपके:-

या रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब (डायथेन एम- ४५) १२५१० ग्रॅम, ५०० लिटर पाण्यात मिसळुन प्रति हेक्टर फवारणी करावी.

### कापणी व मळणी:-

तीळ पिकाची कापणी अगदी वेळेवर करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण कापणी उशीरा केल्यास बोंडे फुटुन तीळ शेतात गळुन पडतात. ज्यावेळी पानांचा रंग पिवळा होऊन पाने गळु लागतात तसेच बोंडाचा, खोडांचा रंग पिवळसर होतो. तेव्हा पीक कापणीस योग्य झाले असे समजावे. कापणी केल्यानंतर झाडांच्या पेंडया बांधुन त्या एक बांबु जमिनीत रोवुन त्याच्या भोवती उभ्या रचुन ठेवाव्यात. पेंडया चांगल्या वाळल्यावर ताडपत्रीवर एक एक पेंडी उलटी करुन हाताने किंवा काठीने झटकावी. काडी, कचरा काढुन, ऊफणणी करुन, तीळ स्वच्छ करावे. व २ ते ३ वेळा कडक उन्हात वाळवावे. साठवण करताना जर दुर्लक्ष झाले तर किडी तीळ खातात आणि तिळाचा फक्त भुगा शिल्लक राहतो.




मार्गदर्शक

**डॉ. एस.डी.मोरे**
संचालक, कृ.वि.के.

**डॉ.देविकांत देशमुख**
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख (उद्यान विद्या शास्त्रज्ञ)
मो.९४२३१४०५९८



भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत

जे.एन.आय.ई.एस.टी.आर.ट्रस्ट, नांदेड
संचलीत


## कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी, नांदेड

# तिळ लागवड तंत्रज्ञान




लेखक

**प्रा. संदिप जायभाये**
(कृषि विद्या शास्त्रज्ञ)
मो. ९५४५४४२२८१

**प्रा. माणिक कल्याणकर**
(पीक संरक्षण शास्त्रज्ञ)
मो. ९४२२१७४१२९

पत्ता : कृषि विज्ञान केंद्र, पोखर्णी, पुर्णा रोड, नांदेड.
फोन. नं. ०२४६२-२७०११५, २७०११४
ईमेल : - kvk_nanded@yahoo.co.in
वेबसाईट :- www.kvknanded.com